दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक १० • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आता फेक नरेटिव्ह चालणार नाही, देवेंद्र फडणवीसांचा दावा

## राज्यात महायुतीचेच सरकार येणार


मुंबई (वृत्तसंस्था)–आगामी विधानसभा निवडणुकीची तारीख आता काही दिवसांवर आली आहे. या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी आता जोरदार तयारी करण्यास सुरुवात केली आहे. उमेदवारांची नावे देखील जाहीर करणे सुरू असून ही प्रक्रिया देखील आता अंतिम टप्प्यात आली आहे. यंदा सरकार कोणाचे येणार यावर बोलताना महायुतीचे सरकारच येईल असा दावा केला आहे.देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, हरियाणाबाबत सगळे पोलपंडीत सांगत होते भाजपाचा दारुण पराभव होणार. पण भाजपाला प्रचंड बहुमत मिळाली. त्यामुळे सकाळी टीव्हीसमोर बोलणारे दुपारी काय बोलू या संभ्रमात पडले होते, असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावर नाव न घेता टोला लगावला आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला काही प्रमाणात यश मिळवता आले. फेक नरेटिव्हच्या भरवशावर त्यांनी यश मिळवले, असे ते म्हणाले.



पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राहुल गांधींनी आरक्षण कसे संपवणार याचा फॉर्म्युला सांगितला. नाना पटोले त्यांचीच रि ओढत आहेत. तसेच लोकसभेच्या निवडणुकीत व्होट जिहाद हा महत्त्वाचा घटक होता. सगळी धार्मिक स्थळे आणि धर्मगुरु व्होट जिहादचा नारा देत होते. आता याचा फायदा होणार नाही. तसेच व्होट जिहादमुळे बहुसंख्य समाजाच्या लक्षात आले की मोदी नकोत म्हणून व्होट जिहाद करणार असेल तर मतपेटीतून उत्तर देता येईल. त्यामुळे फेक नरेटिव्ह आता चालणार नाही.लाडकी बहीण योजनेबाबत मी हे सांगू इच्छितो की आमच्या विरोधकांचं कन्फ्युजन बघा. लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कोलमडणार, निवडणुकीनंतर योजना बंद होणार. दुसरीकडे तेच भाषणांमध्ये सांगतात की हे १५०० रुपये देतात आम्ही निवडून आलो तर २००० रुपये देऊ. यांच्याकडे खजिना आहे का? पैशांचं झाड आहे? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

# गुराख्याला मारहाण प्रकरणी वडाळा गावकऱ्यांचे ताडोबा वन्यजीव कार्यालयात ठिय्या आंदोलन





**वरोरा । प्रतिनिधी**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या भद्रावती तालुक्यातील वडाळा (तु) येथील गुराख्याला मारहाण केल्याच्या निषेधार्थ गावकऱ्यांनी ताडोबा वन्यजीव कार्यालय परिसरात ठिय्या आंदोलन केले. २५ ऑक्टोबर रोजी गुराखी आपल्या गुरांसह वन चराई क्षेत्रात असताना, वनपरीक्षेत्र अधिकारी राउंडवर असताना, कुठलीही विचारपूस न करता गुराख्याला मारहाण केल्याची तक्रार गावकऱ्यांनी केली आहे.

या घटनेमुळे वडाळा गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. त्यांनी आज, २६ ऑक्टोबर रोजी ताडोबा कोर वन्यजीव कार्यालयात लेखी निवेदन सादर केले. गावकऱ्यांनी दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे, तसेच कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना वनपरीक्षेत्र अधिकारी भाविक टिवंडे यांनी सांगितले की, गुराख्याची गुरे कोर क्षेत्रात चरत असल्याने त्याला फक्त बाहेर काढण्यात आले, मारहाण झाल्याचे त्यांनी नाकारले. अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली की, सदर गुराखी तीन वेळा दारूच्या नशेत आढळून आला होता. रोमा वाघिणीचे चार पिल्ले त्या क्षेत्रात असल्याने, गुराख्याला चेतावणी देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अखेर, अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनान ंतर दुपारी ४ वाजता गावकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले.

# आ.किशोर जोरगेवार उद्या दाखल करणार नामांकन; भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

**चद्रंपुर । प्रतिनिधी**

चंद्रपूर चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार , सोमवारी, भारतीय जनता पक्ष महायुतीचे उमेदवार म्हणून नामांकन अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

किशोर जोरगेवार यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपा पक्षात प्रवेश केला. त्यांना भाजप तर्फे महायुतीची उमेदवारी देण्यात आली असून आता ते भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. चंद्रपूरच्या विकास कामांना आता अधिक वेग मिळेल, असा विश्वास जोरगेवार यांनी व्यक्त केला आहे.



उद्या दुपारी १२ वाजता गांधी चौक येथून आमदार जोरगेवार यांच्या नेतृत्वात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रॅली जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत नेण्यात येईल, जिथे जोरगेवार नामांकन अर्ज दाखल करतील. नागरिकांनी मोठ्या संख्येने रॅलीला उपस्थित राहावे, असे आवाहन जोरगेवार यांनी केले आहे.

# हजारोंच्या साक्षीने विरोधी पक्षनेते वडेट्टीवार दाखल करणार नामांकन

## छत्तीसगढचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र बघेल यांची उपस्थीती–ब्रम्हपुरीत महारॅलीतून करणार शक्तिप्रदर्शन

**चद्रंपुर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले. आगामी महिन्याच्या २० तारखेला संपूर्ण राज्यात मतदान होणारं आहे. या पार्श्भूमीवर राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार हे तिसऱ्यांदा ब्रम्हपुरी मतदार संघातून निवडणूक लढविणार असुन याकरिता आज छत्तीसगढ राज्याचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र बघेल यांच्या विशेष उपस्थितीत काँग्रेस तसेच महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्ष नेते व पदाधिकारी यांसह हजारोंच्या साक्षीने नामांकन दाखल करणार आहे.




राज्यात विधानसभा निवडणुका घोषित होताच सर्व राजकीय पक्ष यांनी उमेदवारी देण्यापूर्वी प्रत्येक मतदार संघाची कसून चाचपणी सुरू केली. यात राजकिय नेत्यांच्या पक्षांतर्गत बैठकी, उमेदवारांची निवड यात बराच कालावधी लोटला. आता उमेदवारी नामांकन दाखल करण्यासाठी केवळ दोन दिवस शिल्लक असताना आज राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार तसेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विजय वडेट्टीवार हे तिसऱ्यांदा नामांकन दाखल करणारं आहेत. या पार्श्भूमीवर छत्तीसगढ राज्याचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र बघेल यांची प्रमूख उपस्थीती राहणार असुन तत्पूर्वी ब्रम्हपुरी शहरांतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पटांगणात आयोजित सभा तसेच येथूनच निघणाऱ्या भव्य महारॅली करीता ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रांतील ब्रम्हपुरी, सावली, सिंदेवाही तालुक्यांतील नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी होणार आहेत. आयोजित महारॅलीचा प्रशासकीय भवन येथे समारोप होईल. आयोजित नामांकन दाखल करण्यासाठी संपूर्ण क्षेत्रातून सर्व काँग्रेस पक्ष पदाधिकारी तथा महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष नागरिकांनी पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक यांनी उपस्थित राहावे. असे आवाहन ब्रम्हपुरी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुंबईतील भुलेश्वरमध्ये मोठं घबाड सापडलं; १३२ कोटींची रोकड जप्त

**मुंबई । मनोज उतेकर**

मुंबईच्या भुलेश्वरमधून १ कोटी ३२ लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतलं आहे. या रकमेची नेमकी मालकी कोणाची आहे, याबाबत पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

यापूर्वी पुण्यात रोकड नेण्यासाठी आरोपींनी कारचा वापर केला होता, परंतु आता पाच लोक संशयितरित्या बॅग घेऊन जात होते. पोलिसांना संशय आल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. भुलेश्वरसारख्या वर्दळीच्या ठिकाणाहून लोक कुठे जात होते, आणि ही रक्कम कोणाची आहे, याचा तपास करण्यासाठी पोलिसांनी या पाचही जणांना ताब्यात घेतलं आहे. याबरोबरच, या प्रकरणात आयकर विभागाला पाचारण करण्यात आलं आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर सातत्याने अशी रोकड सापडत असल्याने पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.निवडणूक आयोगाने निवडणुकांची घोषणा केल्यानंतर आणि आचारसंहिता लागू झाल्यानंतर पुण्यात दोन ठिकाणी मोठं घबाड सापडलं होतं. पुणे–सातारा राष्ट्रीय महामार्गावर खेड शिवापूर टोलनाक्यावर एका कारमध्ये तब्बल पाच कोटी रुपयांच्या नोटा सापडल्या होत्या. त्यानंतर हडपसरमध्येही पोलिसांनी नाकाबंदीच्या वेळी (२२ ऑक्टोबर) संध्याकाळी एका गाडीतून तब्बल २२ लाख ९० हजार रुपये रोकड जप्त केली होती. आता मुंबईतील भुलेश्वरमध्येही असंच मोठं घबाड सापडलं आहे.



# हनुमान मूर्ती विटंबना प्रकरण : पोलिस तपासात आरोपीला अटक, संतप्त नागरिकांचा रोष शमला

**चद्रंपुर । प्रतिनिधी**

चंद्रपूर–बल्लारपूर मार्गावरील भिवकुंड परिसरातील हनुमान मंदिरात शनिवारी (दि. १९) रात्री हनुमान मूर्तीची विटंबना केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. या घटनेनंतर बल्लारपूर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. अखेर, पोलिसांनी तपास यशस्वी करून चंद्रपूर येथील आरोपीला शुक्रवारी (दि. २५) अटक केली आहे.

भिवकुंड परिसरातील हनुमान मंदिरात घडलेल्या या प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी रोष व्यक्त केला होता. पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले की, आरोपीने रागाच्या भरात हनुमान मूर्तीची विटंबना करून तोडफोड केली होती. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याबाबतची माहिती पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांच्या चौकशीत असे समजले की, आरोपी आणि त्याच्या पत्नीत वाद झाल्याने पत्नी बल्लारपूर येथील नातेवाईकांकडे राहण्यासाठी गेली होती, ज्यामुळे आरोपीला पश्चाताप झाला. शनिवारी रात्री आरोपी दुचाकीने बल्लारपूरकडे निघाला, मात्र सैनिक शाळेच्या वळणावर त्याच्या दुचाकीत बिघाड झाला. या प्रकारामुळे तो संतप्त झाला व त्याने दुचाकी हनुमान मंदिराजवळ ठेवून चंद्रपूरकडे जाण्यासाठी प्रयत्न केला, पण रात्रीची वेळ असल्याने एकही वाहन थांबत नव्हते. या रागाच्या भरात त्याने मंदिरातील हनुमान मूर्तीची विटंबना केली.मूर्तीची विटंबना झाल्याने विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला होता. त्यांनी रास्ता रोको आंदोलन करण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपीला तातडीने अटक करण्याची मागणी करत बल्लारपूर शहर बंदची हाक दिली होती. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी त्वरीत तपास करून आरोपीला अटक केली, ज्यामुळे संतप्त नागरिकांचा रोष काहीसा शमला आहे.

# उमेदवारांचे तळ्यात मळ्यात!

**विविध प्रादेशिक पक्षांची अधिकृत उमेदवारी मिळविण्यासाठी भावी उमेदवारांची धावपळ सुरू आहे. फॉर्म भरण्याच्या अंतिम क्षणापर्यंत ही धावपळ कायम असणार आहे. अनेकांचे अजूनही ईकडे तिकडे असे तळ्यात मळ्यात सुरू आहे. ज्यांना पक्षाची उमेदवारी मिळाली ते समाधानी तर ज्यांना अजूनही नाही मिळाली ते दुसऱ्या पक्षाची उमेदवारी कशी पळवता येईल यासाठी धावपळ करीत आहे. त्यासाठी नवनवीन पक्षप्रवेश व पक्षांतराचा धुमधडाका अनेक ठिकाणी सुरू आहे. एकदा उद्या निवडणूक फॉर्म भरण्याची मुदत संपली की नेमका कोणत्या उमेदवाराने कोणत्या पक्षाकडून उमेदवारी फॉर्म भरला? हे नागरिकांना कळणार आहे. सामान्य माणसाच्या मनातील संभ्रम थांबणार आहे.**

विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झालेला आहे. या निवडणुकीत उमेदवारी फॉर्म भरण्याची तारीख उद्या एक दिवसावर येऊन ठेपली आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्ष आणि निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या अपक्षांमध्ये फार्म भरण्याची चुरस लागलेली दिसते. त्यासाठी इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू केली. विशिष्ट राजकीय पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी त्या त्या पक्षाच्या नेत्यांचे, वजनदार कार्यकर्त्यांचे उंबरठे झिजवणे सुरू झालेले आहे. काहीही झाले तरी चालेल परंतु विशिष्ट राजकीय पक्षाचीच उमेदवारी आपल्याच पदरात पडावी यासाठी इच्छुक आमदार उतावीळ झालेले दिसत आहे. काही पक्षांच्या उमेदवाऱ्या घोषित झाल्या. त्यामुळे अनेकांचे चेहरे पडले आहे. आशेचा किरण मावळल्याने आता जिथे मिळेल तिथे स्वतःला एडजेस्ट करण्याची तयारी काही उमेदवारांची दिसते. ज्यांचे राजकीय पक्षांच्या उमेदवारीच्या गंगेत घोडे न्हाले ते आनंदी असून ज्यांचा गेम जमला नाही ते दुःखी आहे. असे एकंदरीत 'कुठे खुशी, कुठे गम' असे समिश्र वातावरण सर्वत्र उमेदवारांमध्ये दिसत असून मतदार व नागरिक मात्र संभ्रमाच्या चक्रव्युहात अडकलेले दिसताहेत.

अनेकांना अजूनही आपले आवडते उमेदवार आणि आवडत्या पक्षाचे उमेदवार कोण कुठे कळेनासे झाले आहे. काल एक ऐकायला मिळाले. आज दुसरेच ऐकायला मिळत आहे. त्यामुळे नेमके काय चालले? हे सामान्यजनांना कळेनासे झाले आहे. आपला नेता झोपताना आज रात्री ज्या पक्षात होता. तो उद्या सकाळी उठल्यावर त्याच पक्षात आहे की कुठे दुसऱ्या पक्षात गेला काही सांगता येत नाही. केव्हा कोणती बातमी येईल कळायला मार्ग नाही. अनेक नेते पक्षांतराच्या उंबरठ्यावर आहे. कोणत्या कोणत्या पक्षात जाईल याचा काही नेम नाही. अनेक अनेक इच्छुक आमदार मतदारांना आपल्याच पाठीमागे असल्याचे गृहीत धरून चालत आहे. जसे आपण म्हणू त्याप्रमाणे मतदार मतदान करतील या गुर्मीत नेते असल्याने मन मानेल तसे निर्णय घेणे सुरू आहे. काही ठिकाणी तर दररोज नवनवीन पक्ष बदलणे सुरू आहे. बिचारी जनता भोळी भाबडी असून ती नेत्याचे डावपेच कळत नसल्यामुळे आपले साहेब जो निर्णय घेईल तो आपल्या हिताचा असेल या साध्या भावनेने पाठीशी आहे. परंतु त्यांच्या मनात नेमके काय सुरू आहे हे प्रत्यक्ष मतदानानंतरच कळेल.

या वेळेची निवडणूक ही तत्त्वापेक्षा स्वतःचा स्वार्थ कसा पूर्ण होईल याकडेच केंद्रित झालेली दिसत आहे. पूर्वी कार्यकर्ते पक्षाला व पक्षांच्या नेत्यांच्या शब्दाला मान देत असे. पक्ष जो आदेश देईल त्याप्रमाणे वागायचे.

पक्षश्रेष्ठसमोर डोळे वर करून बघायची कार्यकर्त्यात हिम्मत नव्हती. कारण त्यावेळेस नैतिकता नावाची गोष्ट होती. आता तिकीट एक (जागा) आहे आणि उमेदवारी मागणारे अनेकजण असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये

मोठ्या प्रमाणामध्ये रस्सीखेच आहे.




यावेळेसची निवडणुक म्हणजे संगीत खुर्चीसारखा खेळ झाली आहे. या खेळात खुर्ची एक असते आणि ती मिळण्यासाठी तिच्या भोवती धावणारे अनेकजण असतात. तसे आता झाले आहे. आमदारकी म्हणजे समाजसेवा करण्याचा व ही समाजसेवा करतकरत स्वतः मोठे होण्याचा राजमार्ग असल्याची अनेकांना जाणीव झाली आहे. त्यामुळे समाजसेवेसाठी अनेकजण उतावीळ झाले असून अनेकांना आमदार होण्याची घाई दिसत आहे. हे जमत नाही त्यांच्यात नाराजीचे सूर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

नाराज कार्यकर्ते मंडळी वेळप्रसंगी पक्षश्रेष्ठींवरच डोळे वाटारत रातोरात दुसऱ्या पक्षाच्या उमेदवारीसाठी निघून जात आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पक्षांतराचे भूत यावेळेस पहिल्यांदाच बघायला मिळत आहे. अलीकडे कार्यकर्त्यांमध्ये सबुरी नावाचा गुणच उरला नाही की काय असे वाटते. वाट पाहणं कोणालाच जमत नाही. ना नेत्यांना वाट पाहायला वेळ आहे, ना कार्यकर्त्यांना. सगळ्यांना आत्ताच आमदार व्हायचे आहे. पूर्वीसारखे यावेळी नाही तर नाही पुढे पाहू ते थांबायला कोणीच तयार नाही. सगळ्यांना आत्ताच आणि अभीच आमदार बनने का है. त्यामुळे पक्ष गेला खड्ड्यात. आमदारकी माझ्याच गळ्यात पडली पाहिजे. अशी विचारधारा पुढे आल्याने पक्षश्रेष्ठींचे आदेश मानून गप्प बसणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असून जवळपास सर्वच पक्षात बंडखोरांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. अनेक ठिकाणी एका रात्रीत एका पक्षातून दुसऱ्या पक्षात घुसखोरी करीत त्या पक्षाचे तिकीट मिळविणारे कमी नाही. ऐनवेळी अशी घुसखोरी वाढल्याने त्या पक्षात पाच वर्षे प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्यांवर अन्याय होत आहे. हे अन्यायित कार्यकर्ते आपल्या पक्षाच्या उमेदवारामागे किती प्रमाणात व प्रामाणिकपणे उभे राहतात यावर निवडणुकांचे गणित अवलंबून राहणार आहे. अनेक असेही कार्यकर्ते आहे की त्यांनी पाच वर्षे विविध प्रकारच्या सेवा करीत लाखो रुपये आमदारकीच्या आशेने जनसेवेत खर्च केले आहे. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळात पोहोचविली आहे.भावी आमदार होण्यासाठी तन मन धन लावले होते आणि ऐनवेळी घुसखोरी करीत ऐनवेळी दुसरीकडून आलेल्या उमेदवाराने त्यांचे स्वप्न भंग केला आहे.

त्यामुळे निराश व नाराज झालेले हे प्रामाणिक कार्यकर्ते वेळेवर काय भूमिका घेतात? यावरच पक्षाच्या अधिकृत उमेदवाराचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. अजूनही ज्या पक्षाच्या तिकिटा घोषित झाल्या नाही त्या तिकिटांकडे काहींनी आशावादी नजर लावून ठेवली आहे. आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्या मध्यांन्हापर्यंत सर्वच पक्षांचे अधिकृत उमेदवार घोषित होणार आहे. एकदा फार्म भरण्याचा कालावधी निघून गेला की मग ते फार्म मागे घेण्यासाठी या हौश्या, नवश्या,गवश्या उमेदवारांच्या दाढ्या पकडणे सुरू होणार आहे. आणि त्यानंतरही ज्यांची नाराजी दूर करता आली नाही अशा उमेदवारांना झेलणे आलेच. कोण झोपणार? याचे गणित बांधणे सुरू होईल.

---

# सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव,परंतु शेतकऱ्यांच्या हातात फक्त ३८०० रुपये

## दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांचे दिवाळे

**मोहोळ । प्रतिनिधी**



दिवाळीच्या तोंडावर आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन विक्रीतूनही अपेक्षित मूल्य मिळत नसल्याने मोठी हानी होत आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेला ४८९२ रुपये प्रति क्विंटल हमीभाव असतानाही बाजारात शेतकऱ्यांना केवळ ३८०० ते ४२०० रुपये दर मिळत आहे, ज्यामुळे उत्पादन खर्चही निघणे अवघड झाले आहे.

आर्थिक अडचणी, शेतमजुरांची कमतरता, साठवणुकीसाठी अपुरी जागा आणि परतीच्या पावसामुळे झालेले नुकसान यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीला आणले आहे. केंद्र सरकारने २०% आयात शुल्क आकारल्यामुळे सर्व तेलाच्या दरात २० ते २५ रुपये वाढ झाली होती, ज्यामुळे सोयाबीनच्या दरातही वाढ होईल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात दर घटल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.चालू वर्षात पाच ते सहा क्विंटल उतारा घट झाल्याने खरिपातील सर्वाधिक पेरा असलेले सोयाबीन संकटात आले आहे. पेरणीपूर्व मशागत ते काढणीपर्यंत एकरी किमान दहा हजार रुपये खर्च येतो, परंतु व्यापाऱ्यांकडून मातीमोल भावाने खरेदी होत असल्याने उत्पादन खर्चसुद्धा भरून निघत नाही.

---

## साकोळ ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांना यश

# उदगीर-साकोळ-वल्लभनगर एसटी सेवा सुरू

**शिरूर । नितेश झांबरे**



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील व परिसरातील प्रवाशांसाठी आता उदगीर-साकोळ-वल्लभनगर एसटी महामंडळाची बस सेवा सुरू झाली आहे. या सेवेचा शुभारंभ दिवाळीच्या तोंडावर करण्यात आला असून, यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. उदगीर आगारप्रमुख चिन्मय चिटणीसे यांनी ही माहिती दिली आहे.

साकोळ ग्रामपंचायतीच्या वतीने ता.२१ ऑक्टोबर रोजी उदगीर आगारप्रमुखांना निवेदन देऊन, साकोळ व परिसरातील प्रवाशांसाठी पुणे व इतर ठिकाणी जाण्यासाठी एसटी बससेवा सुरू करण्याची विनंती केली होती. या निवेदनात असे नमूद करण्यात आले होते की, खाजगी वाहतूकदारांच्या तिकिटांचे वाढलेले दर शेतकरी, विद्यार्थी व सर्वसामान्यांना परवडत नसल्यामुळे एसटी सेवा सुरू झाल्यास प्रवाशांना आर्थिक सवलत मिळू शकेल.या मागणीची तात्काळ दखल घेत एसटी महामंडळाने ता.२७ ऑक्टोबरपासून उदगीर-साकोळ-वल्लभनगर बससेवा सुरू केली आहे. ही बस सकाळी ९ वाजता उदगीर येथून निघून देवणी, वलांडी, साकोळ, शिरूर अनंतपाळ, अरीमोड, बोरी, बाभळगाव, लातूर, मुरुड, बार्शी, कुरुडवाडी, टेंभुर्णी, इंदापूर, बिगवण, हडपसर आणि पुणे मार्गे वल्लभनगर येथे रात्री ७ वाजता पोहोचणार आहे. परतीच्या प्रवासात ही बस सकाळी ९ वाजता वल्लभनगर येथून सुटून सायंकाळी ५ वाजता साकोळ येथे व उदगीर येथे रात्री ७ वाजता पोहोचणार आहे.उदगीर आगारप्रमुख चिन्मय चिटणीसे यांनी प्रवाशांनी या नव्या सेवेला प्रतिसाद देऊन एसटीने प्रवास करण्याचे आवाहन केले आहे.

---

# जि.प.उ.प्रा.शाळा गिरगाव मध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**तळोधी । प्रतिनिधी**



## विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गिरगाव येथे आज आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात डॉ. विभव दहेकर यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांचे आरोग्य स्थिती तपासली. त्यांच्या सोबत आरोग्य सेविका रोशनी टिकले व औषध निर्माता लक्ष्मीकांत दर्वे यांची उपस्थिती होती.

या शिबिरादरम्यान मुख्याध्यापिका कामडी , सर्व शिक्षक, युवा प्रशिक्षणार्थी आणि स्वयंसेवकांनीही सहभाग घेतला. तपासणी दरम्यान इयत्ता चौथी व दुसरीतील काही मुलींमध्ये हृदयविकाराची लक्षणे आढळल्याने त्यांचे पालकांना कार्ड देऊन तात्काळ पुढील उपचारासाठी वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. तसेच किरकोळ आजारांसाठी तातडीने उपचार करण्यात आले. डॉ. दहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वी सन २०२३-२४ मध्ये इयत्ता पहिलीतील तीन विद्यार्थ्यांवर हर्नियाच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या होत्या. या उपचारां मुळे पालकांनी मुख्याध्यापिका कामडी व सर्व उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.

---

# भद्रावती येथे दिवाळी पहाट संगीत मैफल उद्या


## भद्रावती शिक्षण संस्थेचा उपक्रम

**भद्रावती । प्रतिनिधी**




स्थानिक निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयात दि. २९ ऑक्टोंबर रोज मंगळवारला पहाटे ५ वाजता सूर तेच छेडिता... दिवाळी पहाट संगीत मैफल आयोजित करण्यात आलेली आहे. भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांच्या संकल्पनेतून शिक्षणासोबतच कलेशी, कलावंतांशी बांधिलकी जपत, संवर्धित करीत हा संगीतमय कार्यक्रम दिवाळीच्या शुभपर्वावर दरवर्षी आयोजित केल्या जातो. यानिमित्ताने प्रथितयश गायकांसोबतच परिसरातील नवोदित व होतकरू गायकांना नवे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्या जात आहे. संगीत रसिकजणांनी या संगीत मैफलचा आस्वाद घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक तथा भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांनी केले आहे.

---



**नागभीड तालुक्यात धान कापणी झाल्यावर चार पाच दिवस कडपा वाळवील्यानंतर धानपिकाचे भारे बांधतांना मजूर. छाया :प्रणय बांगरे.**

---

# सी-व्हिजिल पवर आचारसंहिता उल्लंघनाच्या २९ तक्रारी ; १०० मिनिटांत सोडवणूक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कालावधीत सी-व्हिजिल पच्या माध्यमातून आचारसंहिता उल्लंघनाच्या तक्रारी थेट निवडणूक आयोगाकडे करता येत आहेत. या पवर आलेल्या तक्रारींवर १०० मिनिटांत कार्यवाही करण्यात येते. चंद्रपूर जिल्ह्यात २६ ऑक्टोबरपर्यंत एकूण २९ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी १६ तक्रारी तथ्य नसल्यामुळे रद्द करण्यात आल्या, तर उर्वरीत १३ तक्रारींची सोडवणूक झाली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील १६ तक्रारींमध्ये तथ्य आढळले नसून, त्यात ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघातील १, चंद्रपूरतील २ आणि चिमूरमधील १३ तक्रारींचा समावेश आहे. तथ्य असलेल्या आणि सोडवणूक झालेल्या तक्रारींमध्ये चंद्रपूरच्या २, चिमूरच्या ६ आणि वरोरा विधानसभा क्षेत्रातील ५ तक्रारींचा समावेश आहे.




### सी-व्हिजिल पची वैशिष्ट्ये

सी-व्हिजिल पवर तक्रार नोंदवण्यासाठी नागरिकांना प उघडून उल्लंघनाचा प्रकार, स्थान, वेळ आणि घटना छायाचित्रे किंवा व्हिडिओसह टाकावे लागतात. यामुळे नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याचे व्यासपीठ मिळते, तसेच जीपीएसद्वारे लोकेशन ट्रॅक करण्यासह थेट फोटो व व्हिडिओचा वापर करून त्वरित कार्यवाही शक्य होते.

# जिल्हा बँक उपाध्यक्ष यशवंत दिघोरे यांच्या नेतृत्वा खाली शेकडो भाजप कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षप्रवेश

## ब्रम्हपूरीत भाजपला खिंडार-विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षप्रवेश

**ब्रम्हपूरीत । प्रतिनिधी**

राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांच्या सामाजिक बांधिलकी, सर्व समाजाला न्याय देण्याहेतू सुरु असलेले अथक प्रयत्न, सामान्यांप्रती असलेली आपुलकी, सामान्य कार्यकर्त्यांची जाण व क्षेत्रात सुरू असलेल्या विकास कामांचा झंजावत तसेच भोई समाजाला यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजने अंतर्गत हजारोंच्या संख्येने मिळवून दिलेले घरकुले अशा विविध कार्यामुळे प्रेरित होऊन चंद्रपूर जिल्हा बँक उपाध्यक्ष यशवंत दिघोरे यांचे नेतृत्वात शेकडो भाजप कार्यकर्त्यांनी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.



गेल्या काही महिन्यांपूर्वी राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपूरी तालुक्यात हजारोंच्या संख्येने असलेल्या भोई समाज बांधवांना त्यांच्या स्वप्नातील हक्काचे घरकुल मिळवून दिले. तसेच सर्व समाजाप्रती त्यांची आदर भावना, ब्रम्हपूरी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय, मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी विवीध विकासकामे, रोजगार, शिक्षण, आरोग्य अशा विविध कार्यातून त्यांनी मतदारसंघातील जनतेची मने जिंकली आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या सर्वसमावेशक सामाजिक, राजकीय व विकासात्मक दूरदृष्टीकोण तसेच सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या अपेक्षांची जाण असणारा नेता म्हणून या सामाजिक भावनांनी प्रेरित होवून भाजपाच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आयोजित प्रवेशाप्रसंगी मार्गदर्शन पर बोलतांना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, मी सामन्यातून आलो असल्याने मला सामान्य कार्यकर्त्यांची जाण आहे. मला प्रत्येक समाजाला समान न्याय देणे, त्यांचा हक्क मिळवून देण्याची शक्ती ही तुमच्या कडूनच मिळाली आहे. तुमच्या विश्वासाला मी तडा जावू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. ब्रम्हपूरी तालुक्यातील निलज, चौगान, मेंडकी, तुलानमाल, चोरटी, हळदा, कोसंबी, तुलानमेंढा, तुलानमाल, भुज, वांद्रा, आवळगाव, पद्मापुर, मुडझा, चौगान, जुगनाळा, कळमगाव, गोगाव, सायगाव, मुडझा, बोदरा, सिंदेवाही तालुक्यातील आलेसुर, पेंढरी कोके, मिनघरी येथील कार्यकर्त्यांचा विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी दुपट्टा टाकून काँग्रेस पक्षात प्रवेश स्वीकारत स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एकलव्य सेनेचे जिल्हाध्यक्ष मिलींद भन्नारे यांनी केले. आयोजित पक्ष प्रवेश कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ नेते डॉ. देविदास जगनाडे, जिल्हा सहकारी बँकेचे उपाध्यक्ष यशवंत दिघोरे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, एकलव्य सेनेचे जिल्हाध्यक्ष मिलींद भन्नारे, जिल्हा काँग्रेस सचिव विलास विखार, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष मोंटु पिलारे, राजीव गांधी पंचायतराज संघटनचे प्रदेश सरचिटणीस डॉ.थानेश्वर कायरकर, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू नाकतोडे, शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, माजी नगरसेवक संजय ठाकुर, अनुसूचित जाती सेलचे शहराध्यक्ष मुन्ना रामटेके, विमुक्त जाती व भटक्या जमाती सेलचे देवचंद ठाकरे, सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष चंद्रशेखर गणवीर व अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.ब्रम्हपूरी शहरातील माजी नगरसेवक चक्रेश करंबे यांसह अंकुश रामटेके, वैभव हुमने, मनीष गेडाम, संकेत हुमने, अभय दोनाडकर, संदीप कांबळे, साजन पिल्लेवान यांनी सुध्दा यावेळी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे

## पिंपळवाडीतील गरीब शेतकऱ्याच्या मुलाची महाराष्ट्र सुरक्षा दलात निवड; गावकऱ्यांकडून भव्य स्वागत

**उमरखेड । प्रतिनिधी**

पिंपळवाडी येथील गरीब शेतकरी शामराव राठोड यांचा मुलगा दिनेश राठोड याची महाराष्ट्र सुरक्षा दलात निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनेशच्या या यशानंतर गावकऱ्यांनी त्याचा भव्य स्वागत सोहळा आयोजित केला, ज्यात गावातील प्रतिष्ठित मंडळी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.



दिनेशचे बालपण अत्यंत साधेपणात गेले असून, त्याच्या घराची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत आई-वडिलांनी त्याच्या शिक्षणासाठी मेहनत घेतली. त्याने जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर महाराष्ट्र सुरक्षा दलात स्थान मिळवले आहे, ज्यामुळे त्याचे कुटुंब आणि संपूर्ण गावकऱ्यांचा त्याच्याबद्दल अभिमान दुणावला आहे.

गावात स्वागत सोहळ्याच्या निमित्ताने रांगोळी काढण्यात आली होती आणि ढोल-ताशांच्या गजरात दिनेशचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी गावातील ज्येष्ठ मंडळींनी त्याला आशीर्वाद दिले, तसेच त्याच्या पुढील कार्यप्रवासासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. त्याच्या या यशामुळे गावातील तरुणांमध्ये एक नवा विश्वास निर्माण झाला असून त्याला प्रेरणा मानून अनेक तरुण ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नशील झाले आहेत.

दिनेशच्या आई-वडिलांनी त्याच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. त्याच्या आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते, तर वडिलांनी अभिमानाने त्याच्या यशाचे कौतुक केले. त्याचे शिक्षक, मित्रमंडळी आणि संपूर्ण गाव त्याच्या यशाचा साक्षीदार बनले आहेत.

दिनेश राठोडच्या या यशामुळे पिंपळवाडी गावाने एक नवा आदर्श उभा केला आहे.

## ज्यूट, लाकडी यासह स्वयंचलित आकाश कंदील बाजारात दाखल

**मोहोळ (वृत्तसंस्था)**

दीपावली सणाच्या पर्वाला सुरुवात झाली आहे. विविध आकाराचे आणि प्रकारचे आकाश कंदिल बाजारात आले आहेत. यामध्ये इंडियन, ज्यूट, लाकडी, स्वयंचलित याचबरोबर महापुरुषांच्या प्रतिमा असणाऱ्या आकाश कंदिलांची विक्री सुरू आहे. महापुरुषांच्या प्रतिमा असणारे आकाश कंदिल यंदा प्रथमच बाजारात आले आहेत. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा असणाऱ्या आकाश कंदिलांना मोठी मागणी आहे. बाजारात सध्या ९० रुपयांपासून ते दोन हजारांपर्यंतचे आकाश कंदील उपलब्ध आहे.

यंदा हंगामाच्या सुरुवातीपासूनच समाधानकारक पाऊस आहे. शेतकऱ्यांनी उडीद, सोयाबीन, मका पिकांची काढणी करून बाजारात विक्रीही केली आहे. त्यामुळे यंदाच्या दीपवालीत स्टेशनरी,



आकाश खंदील, किराणा, कापड दुकान, पणत्या खरेदीकडे मागील वर्षाच्या तुलनेत २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दीपावालीत किराणा दुकानातही खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केल्याचे दिसते आहे. यंदा ९० रुपये पासून २ हजार रुपयांचे आकाश कंदीलाला ग्राहकाची मागणी आहे.

## चातारी ग्रामस्थांचा समस्यांमुळे विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार

**उमरखेड । प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यातील चातारी येथील ग्रामस्थांनी त्यांच्या समस्यांची सोडवणूक न झाल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची माहिती उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आली असून, निवेदनात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.



चातारी ते ब्राह्मणगाव आणि चातारी ते कोप्रा या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था आहे. या रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी वारंवार मागणी करूनही केवळ आश्वासनेच मिळाली असून कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. तसेच, गावातील अंतर्गत रस्त्यांवरील पाणी साचल्यामुळे वारंवार नागरिकांचे नुकसान होत आहे. विशेषतः वार्ड क्रमांक २ आणि ३ मध्ये या पाण्यामुळे होणाऱ्या हानीचे प्रमाण अधिक असून, नागरिकांना वारंवार त्रास सहन करावा लागत आहे.

वार्ड क्रमांक ३ मधील कॅनॉलच्या अर्धवट कामामुळे पावसाळ्यात मजुरांचे घर पाण्यात बुडतात, परिणामी गोरगरीब नागरिकांचे मोठे नुकसान होते. या सर्व समस्यांबद्दल प्रशासनाने वारंवार आश्वासने दिली, मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. गावकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे की, मतदानावर बहिष्कार घालणे हा शेवटचा पर्याय आहे, मात्र समस्या कायम राहिल्यास हा निर्णय घेण्याची वेळ आली आहे. यावेळी शिवाजीराव माने, संजय पसलवाड, खुशाल माने, प्रकाश भवर, सुभाष धात्रक आणि अशोक हामंद आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## राहुरी तालुक्यात शिवाजीराव कर्डिले यांचा प्रचार दौरामतदारसंघात परिवर्तन अटळ-शिवाजीराव कर्डिले

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार आणि माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी आपल्या प्रचार दौऱ्याला वेग देत मतदारांशी संवाद साधला. कर्डिले यांनी सत्तेत असताना मतदारसंघात विविध विकासकामे सुरू केली होती, मात्र गेल्या पाच वर्षांत मतदारसंघातील विकास ठप्प झाल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी मतदारसंघाच्या दुर्दशेला विद्यमान लोकप्रतिनिधींना जबाबदार धरले आणि विकासासाठी जनतेला परिवर्तनाची गरज असल्याचे सांगितले.



कर्डिले यांनी प्रचार दौऱ्यात राहुरी तालुक्यातील डिग्रस, मुळानगर, वरवंडी, बाभुळगाव, धामोरी बुद्रुक, खडांबे खुर्द, वाघाचा आखाडा, शिलेगाव, तांदुळनेर, वडनेर कनगर यासह विविध गावांना भेट दिली. या प्रत्येक गावात मतदारांनी त्यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत केले. संवाद साधताना कर्डिले म्हणाले, देशाच्या विकासासाठी मोदी सरकारने पंतप्रधान पीक विमा योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज, कृषी सन्मान योजना, आणि विद्यार्थीनींना मोफत उच्च शिक्षण यांसारखे अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले आहेत. यामुळे लोकांमध्ये महायुतीबद्दल विश्वास आहे.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये सुरेश बानकर, शरद भैय्या कर्डिले, विजय डुक्रे, योगेश गिते, भाऊसाहेब पलघडमल, जे. पी. जोर्वेकर, पराजी धनवट, वसंतराव डुक्रे यांच्यासह स्थानिक कार्यकर्त्यांनी कर्डिले यांच्या प्रचार दौऱ्याला पाठिंबा दर्शविला.

### सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कारखान्यात

## कामगारांना २० टक्के बोनस आणि ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या कामकाजावर ऊस उत्पादक व कामगारांचे हित जपण्याची दीर्घ परंपरा असून, यंदाही दिवाळीनिमित्त सर्व कामगारांना २० टक्के बोनस व ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान दिले जाणार असल्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ यांनी सांगितले. या निर्णयामुळे कामगारांमध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण आहे.

गेल्या गळीत हंगामात थोरात कारखान्याने दहा लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त ऊस गाळप केले असून, या कामगिरीसाठी देशपातळीवर पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. दीपावली निमित्त ऊस उत्पादकांना प्रति मेट्रिक टन २१५ रुपये प्रोत्साहन अनुदान देण्यात आले असून, या माध्यमातून कार्यक्षेत्रातील उत्पादकांना ३०१५ रुपये प्रति टन भाव मिळाला आहे. यंदाच्या हंगामात एकरी जास्तीत जास्त उत्पन्न वाढवण्यासाठी ऊस लागवडीत गुंतवणूक वाढवण्याचे आमदार बाळासाहेब थोरात यांनी आवाहन केले.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आमदार बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, कांचन थोरात, माधवराव कानवडे, उपाध्यक्ष संतोष हासे, तसेच सर्व संचालक व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर उपस्थित होते.



### कामगारांच्या कुटुंबांत आनंदाचे वातावरण

**बाबासाहेब ओहोळ यांनी सांगितले की, कामगारांच्या हितासाठी दरवर्षी विमा आणि विविध योजनांसह २० टक्के बोनस व ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान दिले जाते. या निर्णयामुळे कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांचा आनंद द्विगुणित झाला आहे. शिवाय, संगमनेरची बाजारपेठही थोरात कारखाना, दूध संघ, आणि अमृत उद्योग समूहाच्या पेमेंटनंतर फुलणार असल्याने व्यापाऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.**

## संजना जाधव धनुष्यबाण चिन्हावर विधानसभा लढणार: महायुतीत कन्नड जागा शिवसेनेला मिळाली

### दोन्ही सेनेत पहिल्यांदा थेट सामना होणार

**महाविकास आघाडीत ही जागा उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेला देण्यात आली असून, विद्यमान आमदार उदयसिंग राजपूत यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गेल्या २५ वर्षांपासून कन्नड ही जागा शिवसेनेची राहिली आहे, त्यामुळे महायुतीत या जागेवर शिवसेना (शिंदे गट) ला संधी देण्यात आली आहे.**



**संभाजीनगर । प्रतिनिधी**

महायुतीत कन्नड-सोयगाव विधानसभा जागेचा तिढा अखेर सुटला असून, शिवसेना (शिंदे गट) या जागेवर निवडणूक लढवणार आहे. माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या कन्या आणि जिल्हा परिषद माजी सदस्या संजना जाधव या धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. संजना जाधव यांनी आज एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

कन्नड जागेवर महायुतीत गेल्या काही दिवसांपासून संभ्रम होता. मात्र, आता शिवसेनेच्या शिंदे गटाला या जागेवर उमेदवारी देण्यात आल्याने महायुतीत एकमुखता निर्माण झाली आहे. संजना जाधव यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह पक्षप्रवेश केला

# किशोर जोरगेवार यांची भाजपात घरवापसी वनमंत्री मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत प्रवेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील राजकारणाला नव्या वळणावर नेत, किशोर जोरगेवार यांनी आज (२७ ऑक्टोबर) वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत (भाजपा) पुनः प्रवेश केला. तब्बल दहा वर्षांच्या अंतरानंतर जोरगेवार यांची भाजपात घरवापसी झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवारीवरून जोरगेवार यांचे राजकीय नाट्य रंगले होते. भाजपा आणि शिवसेनेची उमेदवारी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाल्यावर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिशेने वाटचाल केली. मात्र, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी नकार दिल्यानंतर त्यांनी भाजपात परतण्याचा निर्णय घेतला. अखेर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते जोरगेवार यांनी भाजपात प्रवेश केला. या प्रसंगी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिरही उपस्थित होते.

जोरगेवार यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात भाजपातूनच झाली होती. मुनगंटीवार यांच्या सहवासात काम करत ते राजकारणात उभे राहिले. मात्र, २०१९ मध्ये उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली आणि विजयी झाले. आता पाच वर्षांनंतर मुनगंटीवार यांनी जोरगेवार यांच्या पक्षप्रवेशाची घोषणा चंद्रपूरमधील हॉटेल एनडी येथे केली. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराध्यक्ष राहुल पावडे, मंगेश गुलवाडे, प्रमोद कडू तसेच पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. नम्रता ठेमस्कर यांचाही यावेळी भाजपात प्रवेश झाला.

पक्षप्रवेशावेळी मुनगंटीवार म्हणाले की, जोरगेवार यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपा समाजसेवा अधिक गतिमान करेल. महायुतीचे सर्व घटक पक्ष आणि कार्यकर्ते जिल्ह्यातील सहाही जागांवर विजय मिळवण्यासाठी सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाचे अस्तित्व कार्यकर्त्यांमुळे आहे, असे मत व्यक्त करत त्यांनी कार्यकर्त्यांचे महत्त्व अधोरेखित केले. नेत्यांची किंमत कार्यकर्त्यांशिवाय दोन हजारांच्या नोटेसारखी असते, असे नमूद करत त्यांनी ब्रिजभूषण पाझारे यांची उमेदवारी मिळवून देण्यासाठी दिल्लीला जाण्याचे कारणही स्पष्ट केले.कार्यकर्त्यांच्या नाराजीसंदर्भात बोलताना मुनगंटीवार यांनी पाझारे आणि राजुरा येथील नाराज नेते शांत होतील व त्यांचा विरोध शमले जाईल, असा विश्वास व्यक्त केला.



## लामजना पाटी जवळील टोल नाक्यावर अपघात;व्यापारी महेश रेशमे यांचा जागीच मृत्यू

**लातूर । प्रतिनिधी**

निलंगा तालुक्यातील व्यापारी महेश शिवाजीआप्पा रेशमे (४९) यांचा आज रात्री लामजना पाटी जवळील टोल नाक्याच्या कठड्याला गाडी धडकून जागीच मृत्यू झाला. महेश रेशमे यांचा मृतदेह किल्लारी येथे रुग्णालयात दाखल करण्यात आला, जिथे डॉक्टरांनी अपघात दरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याचे सांगितले.

महेश रेशमे हे निलंगा येथील व्यापारी होते आणि त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी लातूरमध्ये घर केले होते. त्यांनी रात्री निलंग्याकडे निघाले असताना साडेअकराच्या सुमारास त्यांच्या गाडीने टोल नाक्याच्या कठड्याला धडक दिली. त्यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी निलंगा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार



आहे.शिवसेनेचे नेते लिंबन महाराज रेशमे यांचे महेश रेशमे पुतणे आहेत, तर व्यापारी महासंघ असोसिएशनचे उपाध्यक्ष शिवाजीआप्पा रेशमे यांचे ते मुलगा होते. महेश रेशमे यांच्या अकाली निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

## उदगीर व जळकोट मतदार संघात ‘विजय संकल्प मेळावा’

### विकासाच्या दिशेने एकजुटीचा संकल्प

**लातूर । प्रतिनिधी**

रोजी उदगीर आणि जळकोट मतदार संघाच्या वतीने 'विजय संकल्प मेळावा' साजरा करण्यात आला. या मेळाव्यात प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थिती दर्शवली, ज्यामुळे मी भारावून गेलो.



या मेळाव्यात माजी कॅबिनेट मंत्री ना. संजय बाबुराव बनसोडे यांनी गेल्या पाच वर्षांत केलेल्या कार्याची ही पावती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मी त्यांच्या प्रेम आणि जिव्हाळ्याबद्दल आभार व्यक्त केले. मला दिलेला विश्वास मी पूर्ण केला आहे आणि उदगीरच्या विकासात झालेला बदल आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे शक्य झाला आहे.

आता पुढील पाच वर्षांत उदगीर-जळकोटचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मला तुमच्या सहकार्याची आवश्यकता आहे. एकत्र येऊन विकासाच्या दिशेने एकजुटीने काम करणे आवश्यक आहे. उदगीर व जळकोटचे भविष्य आमच्या हातात आहे, आणि विकासाची नवी कहाणी आपण सर्वांनी एकत्रितपणे लिहित जाऊ.मी माझ्या मतदार संघामध्ये विकासपर्व आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. तुम्हा सर्वांचा मोलाचा साथ मला मिळत आहे, ज्यामुळे मला विश्वास आहे की आपण एकत्रितपणे यशस्वी होऊ. माझा एकच ध्यास आहे - उदगीर-जळकोटचा सर्वांगीण विकास आणि जनतेचा विश्वास सार्थ ठरवणे.

## वर्धा जिल्ह्यात तैलिक महासंघाचा दबाव; हिंगणघाट मध्ये अतुल वांदिले उमेदवार

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांमध्ये तैलिक महासंघाच्या प्रभावामुळे उमेदवारींची घोषणा केल्याने चर्चांना उधाण आले आहे. भाजपने देवळीत राजेश बकाने यांना उमेदवारी दिल्यानंतर काँग्रेसवर दबाव वाढला, ज्यामुळे काठावर असलेल्या शेखर शेंडे यांना वर्ध्यातून उमेदवारी मिळाली आहे. हिंगणघाटमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अतुल वांदिले उमेदवार म्हणून पुढे आले आहेत. अतुल वांदिले यांच्या उमेदवारीसाठी त्यांच्या पूर्वीच्या संपर्क आणि कार्यकारिणीत महत्त्वाचा रोल होता. माजी खासदार रामदास तडस यांनी वांदिले यांना शरद पवार यांच्याशी भेट घालून दिली, त्यानंतर वांदिलेने राजकारणात अधिक सक्रियता दर्शवली आणि अनेक उपक्रम राबवले.

तैलीक समाजातील अस्वस्थतेनंतर, प्रांतिक तैलिक महासंघाने निवडणुकांत प्रत्येक पक्षाने दहा टक्के उमेदवारी तेली समाजासाठी देण्याची मागणी केली होती. वर्धा जिल्ह्यात तीन प्रमुख पक्षांकडून उमेदवारी मिळाल्यामुळे तैलीक समाजाचे स्थान अधिक मजबूत झाल्याचे दिसते.

विदर्भात वर्धा जिल्हा तेली समाजाचा गढ मानला जातो, आणि येथील राजकारणात भाजपच्या एकत्रतेमुळे समाजातील नेत्यांची प्रभावीता वाढली आहे. वर्धा, देवळी आणि हिंगणघाट क्षेत्रात तैलीक समाजाच्या उपस्थितीवर चर्चा सुरू आहे, ज्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये तैलीक समाजाला महत्त्वाचे स्थान मिळवता येईल.

## संविधान संरक्षणासाठी सजग नागरिक यांची भूमिका महत्त्वाची-राहुल मुन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विवेक विचार मंचतर्फे संविधान अमृत महोत्सवानिमित्त महाराष्ट्रभर सामाजिक संवाद मेळावे आयोजित केले जात आहेत. ब्रह्मपुरी येथे आयोजित या मेळाव्यात विवेक विचार मंचचे राहुल मुन यांनी संविधानाचे महत्त्व आणि त्याचे संरक्षण करण्याचे आवाहन केले. त्यांनी संविधानाला राष्ट्राचा आद्य ग्रंथ संबोधून सांगितले की, भारतीय संविधान नागरिकांना मानवी जीवनाचे १०० टक्के संरक्षण देते. संविधानाला राजकारणापासून दूर ठेवत त्याची जपणूक करणे ही सजग नागरिकांची जबाबदारी आहे, असे त्यांनी नमूद केले.



राहुल मुन यांनी संविधान दिवस आणि संविधान भवनाच्या स्थापनेद्वारे शासन व्यवस्थेने दिलेल्या सन्मानाचे महत्त्व मांडले. मात्र, अशा व्यवस्थेवर संविधान बदलण्याचा अपप्रचार करणे हा संविधानाचा अपमान असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

कार्यक्रमात उपस्थितांनी विविध समस्या मांडल्या असता, विवेक विचार मंचचे प्रांत संयोजक सुनील किटकरु यांनी संविधानातील अधिकार आणि मार्गदर्शन यांचे महत्त्व विशद केले. त्यांनी सांगितले की, देशातील सर्वच समस्यांचे समाधान संविधानात आहे. नागरिकांनी संविधानाचा अभ्यास करून त्यानुसार आपले अधिकार समजून घेतले पाहिजेत, तसेच लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या प्रतिनिधींकडून प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न करावेत, असे त्यांनी प्रतिपादन केले.

मेळाव्यात सहभागी महिलांनी प्रमिला उंदिरवाडे, अनुराधा कोसे, अनुपमा ज्ञानबंधू, वंदना भैसारे, दिक्षा भैसारे, प्रमिला लाडे आदींनी सामूहिक बुद्धवंदना व भिमगीते सादर केली. उपस्थित युवकांनी संविधान राजकारणापासून दूर ठेवावे, या विचाराला पाठिंबा दर्शवला व विवेक विचार मंचच्या कार्याशी जुळण्याची इच्छा व्यक्त केली.

प्रांत समन्वयक अतुल शेंडे यांनी विवेक विचार मंचच्या कार्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले, तर जिल्हा संयोजक आशिष घुमे यांनी उपस्थितांचे आभार मानत संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान राखणाऱ्या आणि राष्ट्रहितासाठी सजग असणाऱ्या नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केले.

## निवडणूक कामकाजाची तयारी बिनचूकपणे पार पडावी – जिल्हाधिकारी राहूल कर्डिले



**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा विधानसभा मतदार संघात आगामी २०२४ च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान पथकांचे प्रथम प्रशिक्षण २६ व २७ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले. जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना निवडणूक प्रक्रिया अत्यंत जोखमीची असल्याचे सांगितले. प्रत्येकाने मतदान प्रक्रियेत दक्ष राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रशिक्षणामध्ये मतदान प्रक्रिया, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी, ईव्हीएम मशीनच्या तांत्रिक बाबी, आणि मतदानाच्या दिवशी आवश्यक असलेल्या व्यवस्थेबद्दल माहिती देण्यात आली. उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे यांनी पीपीटीद्वारे सर्व महत्त्वाच्या गोष्टी स्पष्ट केल्या.

प्रशिक्षणात १,३२० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. जी. एस. कॉमर्स कॉलेज, वर्धा येथे ईव्हीएम मशीन हाताळण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षणही आयोजित करण्यात आले. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी प्रशिक्षणास भेट देऊन मतदान पथकांना मार्गदर्शन केले, आणि निवडणूक प्रक्रियेत सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.या प्रशिक्षणामुळे वर्धा विधानसभा मतदार संघातील निवडणूक कामकाज अधिक बिनचूकपणे पार पडण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## वाढोणा–खरकाडा रस्त्याचे डांबरीकरण कधी होणार? नागरिकांची मागणी अद्याप अपुरी

**तळोधी (बा)। प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा-खरकाडा या आडवळणावरील रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिक अनेक वर्षांपासून करत आहेत, मात्र अजूनही या मागणीला प्रतिसाद मिळालेला नाही. खरकाडा येथील ग्रामस्थांनी या संदर्भात शासनाकडे वारंवार निवेदन दिले असून, आलेवाही गट ग्रामपंचायतच्या सरपंच योगिता सुरपाम यांनीही या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक आमदार व बांधकाम विभागाला पत्र व्यवहार केलेला आहे. मात्र, अद्यापपर्यंत रस्त्याचे काम सुरु झालेले नाही.

**※रस्ता धोकादायक स्थितीत, नागरिकांचा संताप※**

खरकाडा गाव जंगल क्षेत्रात असल्याने हा एकमेव रस्ता असल्याने स्थानिक नागरिक,



विशेषतः विद्यार्थी, दररोज या रस्त्याने शाळा आणि महाविद्यालयात जातात. मात्र, रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि बाहेर पडलेल्या गिट्ट्या यामुळे वाहतुकीस अडचणी येत आहेत. गोसेखुर्द कालव्याचे काम सुरु असल्याने जड वाहतुकीमुळे रस्त्याची आणखी दुर्दशा झाली आहे. वाहनचालकांना दररोज तारेवरची कसरत करत सावधगिरीने प्रवास करावा लागतो, ज्यामुळे वेळेचा अपव्यय होत आहे.

**※डांबरीकरणाची तातडीने गरज※**

खरकाडा वासियांसाठी दुसरा पर्यायी रस्ता नसल्याने या मार्गाचे डांबरीकरण तातडीने करावे, अशी नागरिकांची मागणी आहे. कार्यालयीन अडचणी दूर करून खरकाडा रस्त्याचे डांबरीकरण लवकरात लवकर करण्यात यावे, अशी स्थानिकांची कळकळीची विनंती आहे.

## सोनईच्या मुळा कारखान्याचा ऊस प्रवरानगरचा विखे कारखाना घेणार; ऋषिकेश शेटे पाटील यांचा पुढाकार

**राहुरी । प्रतिनिधी**

नेवासे तालुक्यातील सोनईच्या मुळा सहकारी साखर कारखान्याच्या हद्दीत असलेला ऊस प्रवरानगरचा विखे कारखाना घेणार असल्याची माहिती भाजपचे युवा नेते ऋषिकेश शेटे पाटील यांनी दिली. त्यांनी नुकतीच पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली.



सोनईच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रलंबित असलेल्या समस्यांवर यावेळी बोलताना शेटे पाटील म्हणाले, मुळा कारखाना ऊस लवकर नेत नाही, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. ऊसाच्या खोडक्या होऊ लागल्यामुळे शेतकरी संतप्त झाले आहेत आणि काही जणांनी याआधी ऊस पेटवून देण्याच्या घटनाही घडवल्या आहेत.

त्यानंतर, त्यांनी विखे यांच्यासमोर प्रस्ताव ठेवला की, सोनईच्या ऊस उत्पादकांना दिलासा देण्यासाठी मुळा कारखान्याच्या हद्दीतला ऊस प्रवरानगरच्या विखे कारखान्याला देण्यात यावा.

यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, उद्यापासून (दि. २८) प्रवरानगरचा विखे कारखाना सोनईच्या मुळा कारखान्याच्या हद्दीतल्या ऊसाच्या नोंदी घ्यायला सुरुवात करणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ताबडतोब संपर्क साधावा.

शेटे पाटील पुढे म्हणाले, मुळा कारखाना ऊसाची नोंद ज्या तारखेला लावतो, त्यानंतर अनेक दिवसांनंतरही ऊसाला तोडणी दिली जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. त्यांनी शेतकऱ्यांना विश्वास दिला की, यापुढे प्रवरानगरचा विखे कारखाना सोनईच्या मुळा कारखान्याच्या हद्दीतला ऊस न्यायला तयार आहे, त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कोणतीही चिंता न करता ऊसाची नोंद प्रवरानगर कारखान्याला द्यावी.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# देवळी विधानसभा मतदारसंघातील प्रथम प्रशिक्षण कार्यक्रम

**वर्धा । प्रतिनिधी**

देवळी येथे भोंग मंगलकार्यालयात आयोजित निवडणूक विषयक प्रशिक्षणामध्ये जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी अधिकाऱ्यांना चुकता कामा नये, याबाबत दक्ष राहण्याचे निर्देश दिले. त्यांनी स्पष्ट केले की, निवडणूकीच्या कामांना गांभिर्याने सामोरे जाऊन आत्मविश्वासाने काम करणे आवश्यक आहे.या कार्यक्रमात देवळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी प्रियंका पवार आणि तहसिलदार समर्थ क्षीरसागर उपस्थित होते. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी सांगितले की, मतदानाच्या वेळी मॉकपोल, आकडेवारी व फॉर्म १७ सी यांच्या काळजीपूर्वक अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांनी तयारी करावी. २० ऑक्टोबर २०२४ रोजी मतदान होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.


जिल्हाधिकारी कर्डिले यांनी जेष्ठ व्यक्ती, स्तनदा माता, आणि दिव्यांग मतदारांना विशेष सुविधांची आवश्यकता आणि त्या बाबतची दिशा स्पष्ट केली. मतदानाच्या ७२ तास आधी सर्व तयारी पूर्ण करणे आवश्यक आहे. मतदानाच्या दिवशी कागदपत्रे आणि ईव्हीएम मशीनची तात्काळ पडताळणी करणे गरजेचे असल्याचे प्रियंका पवार यांनी सांगितले. देवळी विधानसभा क्षेत्रातील प्रथम निवडणूक विषयक प्रशिक्षणामध्ये २२८ मतदान केंद्राध्यक्ष, ३५८ प्रथम मतदान अधिकारी, आणि ७७० इतर मतदान अधिकारी सहभागी झाले. एका सत्रात ६७८ अधिकारी उपस्थित होते, ज्यामुळे एकूण १,३५६ अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणामध्ये भाग घेतला. यावेळी तहसिलदार अनिकेत सोनवणे, शुभांगी कनवाडे, पुलगावच्या स्नेहा क्षीरसागर, नायब तहसिलदार अजय झिले, आनंद देवकर, अजय धर्माधिकारी, मुन्नालाल भलावी, स्वप्ना दारुणकर, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी साबळे, तसेच आयटीआयचे प्राचार्य संजय कोकुलवार उपस्थित होते.या प्रशिक्षणामुळे निवडणूक प्रक्रियेला गती मिळेल आणि अधिकाऱ्यांची तयारी मजबूत होईल, असे आश्वासन जिल्हा प्रशासनाने दिले आहे.



# दादाराव केचे अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार

**वर्धा । प्रतिनिधी**

आर्वी विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारीवर तिढा कायम आहे. सध्या चर्चेत आमदार दादाराव केचे आणि सुमित वानखेडे यांची नावे पुढे येत आहेत. दादाराव केचे यांनी आज उमेदवारी अर्ज भरण्याची सूचना दिली, परंतु भाजपाचे कमळ चिन्ह न वापरल्यामुळे ते अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार असल्याची माहिती समोर आली आहे.




दादाराव केचे हे चौथ्यांदा उमेदवारीसाठी अर्ज भरत आहेत, तर सुमित वानखेडे यांनी देखील या मतदारसंघात आपली दावेदारी ठेवली आहे. भाजपाने अद्याप कोणत्याही उमेदवाराची अधिकृत घोषणा केलेली नाही, ज्यामुळे दोन्ही नेत्यांमध्ये ताण वाढला आहे. विशेष म्हणजे, दादाराव केचे यांनी पक्षाचा राजीनामा दिल्याच्या चर्चाही आर्वीत रंगल्या आहेत.

अद्याप उमेदवार कोण होणार हे निश्चित झालेले नाही, तरी दादाराव केचे यांच्या निर्णयामुळे आर्वीत चर्चांचा विषय निर्माण झाला आहे. या परिस्थितीत आर्वीत आगामी निवडणुकांच्या दृष्टीने अनिश्चितता कायम आहे.

# आमदार डॉ.पंकज भोयर २८ तारखेला नामांकन अर्ज दाखल करतील; रॅलीत दया शेट्टींचा सहभाग

**वर्धा । प्रतिनिधी**

आमदार डॉ. पंकज भोयर २८ ऑक्टोबर रोजी भाजपाचे अधिकृत उमेदवार म्हणून वर्धा विधानसभेत नामांकन अर्ज दाखल करणार आहेत. या निमित्ताने सकाळी १० वाजता स्थानिक स्वाध्याय मंदिर परिसरातून एक भव्य रॅली काढली जाणार आहे, ज्यामध्ये प्रसिद्ध अभिनेते दया शेट्टी हे प्रमुख आकर्षण असतील.



डॉ. भोयर हे सलग तिसऱ्या विजयाच्या तयारीत असून, यापूर्वी त्यांनी काँग्रेसचे शेखर शेंडे यांना दोन वेळा पराभूत केले आहे. यावेळीही त्यांची लढत शेंडे विरुद्ध भोयर अशीच राहणार आहे.या रॅलीत अनेक प्रमुख नेते आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहेत, त्यात माजी खासदार रामदास तडस, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, केंद्रीय मंत्री प्रल्हाद पटेल, माजी खासदार सुरेश वाघमारे, माजी आमदार सागर मेघे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख गणेश ईखार, आणि इतर मान्यवरांचा समावेश आहे.या रॅलीत जास्तीत जास्त लोकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे, ज्यामुळे डॉ. भोयर यांना अधिक मजबूत आधार मिळेल आणि आगामी निवडणुकांमध्ये त्यांचा विजय सुनिश्चित होईल.

# देहविक्री व्यवसायावर पोलिसांची कारवाई, महिला दलालास अटक;४ पीडितांची सुटका

**चंद्रपूर** –चंद्रपूर-बल्लारपूर बायपास मार्गावरील जुनोना चौकातील एका घरात सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकून चार पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणात एका महिला दलालास अटक करण्यात आली असून, तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.स्थानिक गुन्हे शाखेला जुनोना चौक परिसरातील एका महिलेच्या घरी देहविक्री व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून धाड टाकली असता, संबंधित महिलेच्या घरी चार पीडित महिला आढळून आल्या. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी देहविक्री करत असल्याचे कबूल केले. त्यामुळे त्या महिलांची सुटका करून त्यांना महिला सुधारगृहात पाठविण्यात आले आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक एम. सुदर्शन आणि अप्पर पोलिस अधीक्षक रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक महेश कोंडावार यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात पोलिस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, चेतन गज्जलवार, नितेश महात्मे, किशोर वाकाटे, अमोल सावे, प्रमोद कोटनाके, मिलिंद टेकाम, उषा लेडांगे, अपर्णा मानकर व छाया निकोडे यांचा समावेश होता.

## आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने

# जाधव-पाटील हॉस्पिटलमध्ये ५ व्या मुळव्याध संबंधी शिबिराची यशस्वी सांगता

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील करमाळा शहरातील जाधव - पाटील हॉस्पिटलमध्ये आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून मुळव्याध संबंधीच्या आजाराविषयी शिबिराचे आयोजन आज, रविवार, २७ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले. मुळव्याध आजारासंबंधी महाराष्ट्र राज्यात नामांकित असलेले डॉ. प्रदीप तुपेरे आणि त्यांच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन केले गेले.या शिबिरामध्ये ८१ नागरिकांनी सहभाग नोंदवला. मुळव्याध संबंधीच्या आजाराविषयी विविध तपासण्या करून काही रुग्णांचे ऑपरेशन करण्यात आले. सदर शिबीरातील सर्व सुविधा नामात्र दरामध्ये उपलब्ध करण्यात आल्या. जाधव - पाटील हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. रोहन पाटील यांनी शिबिर आयोजित करण्याबद्दल माहिती देताना सांगितले की, या शिबीरामध्ये ८१ रुग्णांनी तपासणी करून घेतली. त्यासाठी हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व संबंधित कर्मचार्यांनी सहकार्य करून नागरिकांना उत्तम सेवा दिली.करमाळा तालुक्यातील नागरिकांसाठी इथून पुढे विविध रोगांबाबत शिबीरांचे आयोजन करण्याचा मानस असल्याचे डॉ. पाटील यांनी नमूद केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी सचिव अभिजित पाटील, डॉ. शिवानी पाटील, अजिंक्य पाटील, तात्यासाहेब जाधव, प्रमोद जगदाळे, आणि महादेव भोसले यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले.आय कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि शैक्षणिक सेवांचा लाभ तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना मिळवून देण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातून केले जाईल, असे डॉ. रोहन पाटील यांनी सांगितले.




# अखेर सुभाष पवार यांच्या महाविकास आघाडीकडून उमेदवारीवर मोहर

**बदलापूर । प्रतिनिधी**

मुरबाड विधानसभेसाठी महाविकास आघाडीमध्ये उमेदवारीसाठी मोठी चुरस दिसून आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटामध्ये असलेल्या शैलेश वडनेरे यांना डावलून सुभाष पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे शैलेश वडनेरे नाराज असल्याचे बोलले जात आहे.

महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार सुभाष गोटीराम पवार यांचे नामनिर्देशन पत्र २८ ऑक्टोबर रोजी भरणार आहे. त्या अनुषंगाने विचारविनिमय बैठक तसेच पत्रकार परिषद बदलापूर येथील अदिती बँक्केट हॉलमध्ये आयोजित करण्यात आली. शैलेश वडनेरे यांच्या नाराजीबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर सुभाष पवार म्हणाले, पक्षाने घेतलेल्या निर्णयाचा आदर करायचा आहे. शरद पवार साहेबांबद्दलची निष्ठा आणि पक्षाबद्दलचं प्रेम आपल्या कार्यातून दिसून आलं पाहिजे. नाराज होऊन चालणार नाही; एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे.



आम्ही शैलेश साहेबांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करत आहोत.

पुढे सुभाष पवार बोलताना म्हणाले, बदलापूर शहरात राजकीय कार्यक्रमांना फारशी उपस्थिती नसली तरी संपर्क कायम आहे. माजी आमदार गोटीराम पवार यांच्या कार्यकाळात बदलापूर शहरात अनेक विकासकामे केलेली आहेत. पाणी, वीज, वाहनकोंडी आणि आरोग्यासंबंधित जेवढेही प्रलंबित प्रश्न आहेत, ते सगळे सोडवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न मी करेन.विद्यमान आमदारांविषयी सुभाष पवार यांनी नाराजी व्यक्त करत सांगितले की, विकासकामांचे नारळ फुटले आहे, परंतु कार्याला कधीही सुरुवात झाली नाही. विकासकामांना निधी दिला जातो, परंतु प्रत्यक्षात कामाचा शुभारंभ देखील झालेला नाही. या संदर्भात त्यांनी कथोरे यांच्यावर निशाणा साधला. यावेळी व्यासपीठावर विद्याताई वेखंडे, शैलेश जाधव, संजय जाधव, अविनाशजी थोरात, अविनाशजी जाधव, नितीन देशमुख, भूषण देशमुख, रामभाऊ दळवी इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# खासगी वित्तीय संस्थेतील कर्मचारी तरुणीशी अश्लील वर्तन

## तक्रारीनंतर कंपनीकडून प्रकरण दडपण्याचा आरोप



**पुणे । प्रतिनिधी**


खासगी वित्तीय संस्थेत काम करणाऱ्या तरुणीशी अश्लील वर्तन केल्याप्रकरणी येरवडा पोलिसांनी व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत तरुणीने कंपनीतील महिला तक्रार निवारण समितीकडे तक्रारही दिली होती. मात्र, समितीने तरुणीच्या तक्रारीची दखल घेतली नाही. आरोपी व्यवस्थापकाने तरुणीला त्रास देण्यास सुरुवात केल्यानंतर तिने पोलिसांकडे धाव घेतली.

या प्रकरणी व्यवस्थापक शुभम दुबे (वय ३४) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका तरुणीने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शुभम दुबे एका प्रसिद्ध खासगी वित्तीय संस्थेत व्यवस्थापक आहे. येरवडा भागातील आयटी पार्क परिसरात कंपनीचे कार्यालय आहे. तरुणी वित्तीय संस्थेत कर्मचारी आहे. तरुणी प्रसाधनगृहात जाताना दुबे तिचा पाठलाग करायचा. प्रसाधनगृहाजवळ त्याने तरुणीला अडवून असभ्य वर्तन केले. त्याने तरुणीकडे शरीरसुखाची मागणी केली. मागणी पूर्ण न केल्यास कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली. तरुणीने त्याला नकार दिला. त्यानंतर तो तिला त्रास देत होता. त्याच्या त्रासामुळे तरुणीने वित्तीय संस्थेतील महिला तक्रार निवारण समितीकडे तक्रार दिली. मात्र, समितीने तिच्या तक्रारीची दखल घेतली नाही आणि प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपी दुबेने तरुणीला पुन्हा त्रास देण्यास सुरुवात केली, असे तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. अखेर तरुणीने येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक प्रियंका देवकर-पाटील तपास करत आहेत.

# अंभोडा येथील अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावले संवेदनशील आमदार संजय गायकवाड

**बुलढाणा । प्रतिनिधी**

अंभोडा येथील धाड रोडवरील तांदुळवाडी फाट्याजवळ आज सायंकाळी ट्रॅक्टर आणि टिप्पर यांच्यामध्ये भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत सात ते आठ व्यक्ती गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड तातडीने बुलढाणा शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल झाले.



आ. गायकवाड यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्याशी संपर्क साधून रुग्णालयातील यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले. त्याचबरोबर धर्मवीर युथ फाउंडेशनचे अध्यक्ष पृथ्वीराज गायकवाड आपल्या कार्यकर्त्यांसह रुग्णालयात हजर होते. सर्व जखमींना तातडीने प्रथमोपचार मिळेपर्यंत आ. संजय गायकवाड रुग्णालयात उपस्थित होते. त्यांच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्तांना ताबडतोब आवश्यक उपचार मिळाले, यामुळे जखमींना तातडीची मदत मिळण्यास हातभार लागला.

# महायुतीच्या उमेदवार डॉ.प्रतिभाआक्का पाचपुते विधानसभेच्या रिंगणात

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी व नेते यांच्या समवेत चर्चा केल्यानंतर उमेदवार म्हणून उद्या सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ११.३० वाजेनंतर २२६ - श्रीगोंदा - नगर या मतदारसंघातून आपण अर्ज भरण्याचा निर्णय घेतला आहे.

अतिशय साध्या पद्धतीने कुठलेही शक्ती प्रदर्शन न करता मतदार संघातील सामान्य व्यक्तींच्या हस्ते व महायुतीचे प्रमुख पदाधिकारी यांच्या हस्ते व उपस्थितीत आपण फॉर्म भरून ही प्रक्रिया पूर्ण करणार आहोत.तरी महायुतीच्या कार्यकर्ते, पदाधिकारी व नेते या सर्वांनी नोंद घ्यावी व उपस्थित रहावे असे आवाहन आमदार बबनरावजी पाचपुते यांनी केले आहे...!

# बल्लारपूर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसकडून संतोष रावत रिंगणात,भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांच्याशी थेट लढत

**मूल । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या तिकिटावर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते संतोष रावत बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचे निश्चित झाले आहे. काँग्रेसला या मतदारसंघाची जागा मिळाल्याने रावत यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.



गेल्या २५ वर्षांपासून काँग्रेसमध्ये सक्रिय असलेले संतोष रावत यांनी गेल्या वर्षभरापासून निवडणुकीसाठी तयारी सुरू ठेवली होती. मुल नगर परिषदेचे नगराध्यक्ष, बाजार समितीचे सभापती आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष या विविध पदांवर काम करत त्यांनी आपली यशस्वी कारकीर्द सिद्ध केली आहे. सध्या ते मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

यावेळी त्यांची थेट लढत भारतीय जनता पार्टीचे हेविवेट नेते आणि राज्याचे वने सांस्कृतिक कार्य व मत्स्य विकास मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याशी होणार आहे. काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते संतोष रावत यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत, त्यामुळे रावत चांगली लढत देतील, असा विश्वास काँग्रेसने व्यक्त केला आहे.

# युवा नेते अक्षय कर्डिले यांची अपघातग्रस्तांना तातडीची मदत

## ग्रामीण रुग्णालयाच्या गलथान कारभारावर नाराजी




**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी खुर्द येथील नगर-मनमाड रस्त्यावर आज २७ ऑक्टोंबर दुपारी १२ वाजता भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. यावेळी भाजप युवा जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले हे राहुरी दौऱ्यावर असताना अपघाताची माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन जखमींना राहुरी ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयात डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसल्याने अपघातग्रस्तांना तातडीची वैद्यकीय मदत मिळण्यात अडथळा आला.

या अनागोंदी कारभाराबद्दल अक्षय कर्डिले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ग्रामीण रुग्णालयाच्या प्रशासनाच्या गलथान कारभारावर त्यांनी कठोर शब्दांत टीका केली असून, अपघातग्रस्तांना वेळेत उपचार मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## बाराशे रुपयांच्या हिशेबाचा वाद भिडला टोकावर

# सिद्धार्थचा मृत्यू बसच्या खिडकीतून थेट रस्त्यावर

**मुक्ताईनगर (प्रशांत कुंडकर):आजची तरुण पिढी या देशाचे उज्वल भवितव्य आहे. या राष्ट्राला आणि समाजाला तरुणांची नितांत गरज आहे, असे भाषणात बोलायला आणि निबंधात लिहायला फार बरे वाटते. मात्र, वास्तवतेत आजच्या तरुण पिढीला मतलबी नेते मंडळी वापर करून घेत आहेत. तरुणांना चांगले शिक्षण आणि योग्य नोकरी कशी मिळेल, याचा खरे अर्थाने विचार करणे गरजेचे आहे. तरुणांमधे शिक्षण आणि संस्कृतीची कमतरता राहू नये. आजची तरुण पिढी पूर्णपणे साक्षर आणि निर्व्यसनी असावी, असा विचार जेव्हा आजच्या नेत्यांच्या मनात येईल, तेव्हा हा देश खरेच सुजलाम – सुफलाम होईल. तथापि, आजची तरुण पिढी मोठ्या संख्येने व्यसनाच्या आहारी जात आहे, ज्यामुळे संस्कृतीचा नाश होत आहे. शिक्षणाच्या अभावामुळे तरुण पिढी विनाशाकडे वाटचाल करत आहे.**



मयत सिद्धार्थ बनसोड



आरोपी स्वप्नील परिहार



आरोपी भरत रहांगडाले

मद्याचे व्यसन आणि शिक्षणाचा अभाव असलेल्या दोघा मित्रांनी त्यांच्या एका मित्राला धावत्या बसच्या खिडकीतून फेकून दिल्याने मृत्यू झाल्याची घटना काही महिन्यांपूर्वी जळगाव जिल्ह्याच्या मुक्ताईनगर पोलिस स्टेशन हद्दीतील महामार्गावर घडली. वरवर हा रस्ता अपघाताचा प्रकार वाटत असला तरी, पोलिस निरीक्षक नागेश मोहिते आणि त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक राहुल बोरकर यांच्या तल्लख बुद्धीने हा खूनाचा प्रकार उघडकीस आला.

सिद्धार्थ विकास बनसोड, स्वप्नील गजराम परिहार आणि भरत चुनिलाल रहांगडाले हे तिघे मित्र होते, सर्व गोंदीया जिल्ह्यातील रहिवासी. तिघांच्यात शिक्षणाचा अभाव होता आणि मद्यपानाची सवय लागली होती. मद्याच्या नशेत असले म्हणजे तिघे एकमेकांना शिवीगाळ व मारहाण करत असत.

सिद्धार्थ, स्वप्नील आणि भरत हे बेरोजगार तरुण मित्र सुरत येथे नोकरी मिळवण्यासाठी गेले होते. तिथे त्यांची वैद्यकीय चाचणी झाली, ज्यात तिघे मद्यपी म्हणून फेल झाले. त्यामुळे त्यांना गोंदीया जिल्ह्यात परतण्याची वेळ आली. परतीच्या प्रवासासाठी ठेकेदार कंपनीने त्यांना बाराशे रुपये दिले.

कमी पैशात तिघे मित्र लक्झरी बसने प्रवास करत होते. ५ जुलैच्या रात्री, बाराशे रुपयांच्या वाटणीवरून वाद सुरु झाला, जो थोडक्यात हिंसक बनला. सिद्धार्थने त्याचे साथीदारांना शिवीगाळ सुरू केली. बस जळगाव जिल्ह्याच्या मुक्ताईनगर परिसरातून जात असताना, स्वप्नील आणि भरत यांच्यात सिद्धार्थला धावत्या बसच्या खिडकीतून फेकून दिले.

बसच्या चालकाच्या कॅबीनचा दरवाजा व खिडक्या प्लायवूडच्या स्लायडिंग स्वरूपात असल्याने चालकाला याबाबत काही कळले



नाही. अंधारामुळे सिद्धार्थ बाहेर फेकला गेल्याचे त्यावेळी कोणालाही दिसले नाही. डोक्यावर आपटल्याने त्याचा मृत्यू झाला. पहाटेच्या अंधारात पितांबर अरुण गुरव या जागरूक नागरिकाला सिद्धार्थचा मृतदेह महामार्गावर आढळला. या घटनेची माहिती पोलिस पाटील सौ. स्नेहल प्रदीप काळे यांना कळवली. घटनास्थळी पोहचल्यावर मयत अवस्थेत पडलेल्या इसमाच्या डोक्याला जबर मार लागलेला होता. पोलिसांनी घटनास्थळी येऊन तपास सुरू केला. अज्ञात व्यक्तीच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. मयत सिद्धार्थला ओळखणारा कोणीही नसल्याने त्याच्या मृत्यूचा तपास सुरू झाला. सिद्धार्थच्या कपड्यांवरून तो भिकारी असल्याचे नाहीसा होत होते, आणि त्याच्या खिशात ओळखपत्र नव्हते. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणात संशयित तपास सुरू केला.

तपासात पोलिस उपनिरीक्षक राहुल बोरकर यांनी लक्झरी बसेसच्या माहिती गोळा केल्या. या तपासादरम्यान, मलकापूरकडे जाणाऱ्या ट्रकच्या चालकाने माहिती दिली, त्यामुळे पुढील तपासाला दिशा मिळाली. सीसीटीव्ही फुटेजमधून सिद्धार्थसोबत प्रवास करणारे तिघे मित्र आढळले. स्वप्नील आणि भरत यांच्या कबुलीवरून सिद्धार्थला बसच्या खिडकीतून फेकून दिल्याची माहिती मिळाली. दोघांना अटक करण्यात आली, आणि त्यांनी आपल्या रागाच्या भरात सिद्धार्थला फेकून दिल्याची कबुली दिली. याप्रकारे हा अपघात नसून घातपात असल्याचे तपासात स्पष्ट झाले, आणि पो.नि. नागेश मोहिते व पोलिस उप निरीक्षक राहुल बोरकर यांनी चाणाक्ष बुद्धीने तेरा दिवसात या प्रकरणाचा उलगडा केला.



पोलिस उपनिरीक्षक राहुल बोरकर



पोलिस निरीक्षक नागेश मोहिते



## जागेवरून तोडगा निघत नसेल तर सुट्ट खेळू

# स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या कोण किती पाण्यात आहे हे होऊन जाऊद्या-सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभेच्या जागेवरून सुरू असलेला वाटाघाटीचा तिढा सुटत नसेल तर माझी महायुतीच्या नेत्यांनी विनंती आहे घड्याळ नको कमळ नको आम्ही तिघे म्हणजे मी सुरेश धस,भीमराव धोंडे,बाळासाहेब आजबे यांना स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या,कुणाची किती ताकद आहे आणि कुणाची किती पत आहे हे निकालाच्या कळेल तसेच कोण किती पाण्यात आहे हे ही दिसेल त्यामुळे एकदा होऊन जाऊद्या सूट्टा खेळ म्हणत धस यांनी गर्जना केली.

आष्टी येथील निवासस्थानी धस समर्थकांनी शुक्रवारी सकाळपासून मोठी गर्दी केली होती.गुरुवारी काही बालिश लोकांनी सोशल मीडियावर मी निवडणुकीतून माघार घेणार असल्याच्या पोस्ट व्हायरल केल्या होत्या.त्या पार्श्वभूमीवर धस समर्थकांनी आज आष्टी येथील त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत घोषणाबाजी केली.या उपस्थित कार्यकर्त्यांशी बोलताना धस पुढे म्हणाले की,पहिल्या यादीत नाव यावं ही अपेक्षा होती.पक्षाच काम आत्तापर्यंत प्रामाणिक केले आहे.ज्या ठिकाणी भाजप निवडून येणार नाही अशा स्थानिक स्वराज्य संस्थेवर मी उभा राहिलो निवडून आलो माजी मुख्यमंत्री,ग्रामविकास मंत्री यांनी सहकार्य केले.लोकसभेला देखील प्रामाणिक काम केले.२०१९ लोकसभा आणि आत्ताची लोकसभा कुणी प्रामाणिक काम केलं हे पक्षाने तपासाव.वाडी वस्ती तांड्यावर गेलो लोकांना मतदान करा म्हणून आवाहन केलं.बाकीच्यांनी कुठे सभा घेतल्या काय काम केलं याचा लेखाजोखा



पक्षाला द्यावा.माझं काम लोकांना दिसतंय कुणाला सांगायची मला गरज वाटली नाही.संकटात लोकांना गरज असताना हे घरात गोधड्या घेऊन झोपले होते.कोरोणा काळात माझ्या दारात लोक मला भेटायला येत होते तेव्हा माझं दार २४ तास उघड होत.त्यावेळी आजी माजी कुठ होते.आता निवडणूक आली म्हणून जाती पातीच विष पेरायच काम सध्या इच्छुक उमेदवारांकडून केले जात आहे.माझ्या राजकीय जीवनात मी कधी कुणाची जात विचारली नाही.पण त्यात काम करणाऱ्या माझ्या सारख्या माणसाला गोवल जातंय ही फार मोठी शोकांतिका आहे..माझ्यावर तुतारीला भेटायला गेलो असा आरोप [illegible]ला जातोय.एक जण तुतरीकडे जाण्यासाठी १ महिन्यांपासून उठ बशा काढत होते.आता म्हणतेत मी भेटलोच नाही आणि यात तथ्य नाही.तर दुसरीकडे एक जण मी सकाळी एकाला दुपारी एकला संध्याकाळी एकाला भेटलो असा डांगोरा पिटत आहेत.त्यामुळे अशा लोकांना बालिश बहु बायकात बडबडला...असेच म्हणावे लागेल.लाडकी बहिण कार्यक्रमाला ४०० रुपये रोज देऊन महिला आनाव्या लागल्या.सगळं बोलणार आहे सगळं काढणार आहे मात्र ४ तारखे नंतर बोलायला सुरुवात करेन. २०१९ ला स्वतःच्या चुकांनी पडले आणि आमच्यावर खापर फोडून कटप्पा बाहुबलीच्या जाहिराती कोणी दिल्या.मग त्या बाहुबलीला सांगू इच्छितो निवडणुकीच्या काही दिवसात लागलेल्या नगरपंचायत निवडणुकीत आष्टी पाटोदा शिरूर कासार या तिन्ही नगरपंचायत कशाकाय माझ्या ताब्यात लोकांनी दिल्या.याच एकच कारण २४ तास तेवढं लोकांसाठी झिजाव लागतं.सुखात दुःखात जाव यावं लागतं.आता विधानसभेच्या निवडणुका लागल्यात आष्टी विधानसभेच्या जागेवरून सुरू असलेला तिढा अजूनही सुटला नाही.आणि तो जर सुटत नसेल तर माझी महायुतीच्या प्रमुख नेत्यांना विनंती आहे,तोडगा निघत नाही ना तर मग या मतदार संघात घड्याळ देऊ नका,कमळ देऊ नका आम्हाला तिघांना स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या म्हणजे सुट्टा खेळ होईल.जो निवडून येईल त्याला त्याचा पक्ष स्वतंत्र वाहनाने मुंबईला घेऊन जाईल.अशी गर्जना करत सुरेश धस यांनी निवडणुकीत रंग भरला आहे.यावेळी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते निवासस्थानी आले होते.